# सर्वोत्कृष्ट व्यवस्थापन संस्था पुरस्कार डॉ. बेडेकर इन्स्टिट्यूटला

ठाणे : बॉम्बे मॅनेजमेंट असोसिएशनतर्फे श्रेणी-३ वर्गामध्ये व्यवस्थापन शिक्षण क्षेत्रात उत्कृष्ट कार्य केल्याबद्दल देण्यात येणारा सर्वोत्कृष्ट व्यवस्थापन संस्था-२०१८ हा पुरस्कार ठाण्यातील डॉ. व्ही. एन. बेडेकर इन्स्टिट्यूट ऑफ मॅनेजमेंट स्टडीज यांना एका शानदार समारंभात देण्यात आला.

डॉ. व्ही. एन. ब्रीम्सच्या व्यवस्थापन शिक्षण क्षेत्रातील या उत्कृष्ट योगदानाची दखल घेत जाहीर झालेला हा पुरस्कार पाणिनी सभागृहातील एका समारंभात बॉम्बे मॅनेजमेंट असोसिएशनचे अध्यक्ष एम. डी. अग्रवाल यांच्या हस्ते डॉ. व्ही. एन. बेडेकर इन्स्टिट्यूट ऑफ मॅनेजमेंट स्टडीजचे संचालक डॉ. नितीन जोशी यांनी स्वीकारला. डॉ. व्ही. एन. बेडेकर इन्स्टिट्यूट ऑफ मॅनेजमेंट स्टडीज (डॉ. व्ही. एन. ब्रीम्स), ठाणे ही विद्या प्रसारक मंडळाच्या अंतर्गत असलेली, उद्योग व्यवस्थापन आणि संबंधित क्षेत्रात दर्जेदार शिक्षण देणारी एक अग्रगण्य व्यवस्थापन शिक्षण संस्था आहे. या पुरस्काराबद्दल बोलताना डॉ. विजय बेडेकर म्हणाले, बॉम्बे मॅनेजमेंट असोसिएशनकडून मिळालेला हा पुरस्कार आमच्यासाठी अत्यंत महत्त्वाचा आहे. असे पुरस्कार आम्हाला शिक्षण क्षेत्रातील नावीन्यपूर्ण ध्यास, सुधारणा आणि योगदान करण्यासाठी प्रवृत्त करतो. अथक परिश्रम व चिकाटीने आम्ही योग्य मार्गाने वाटचाल करत असल्याची जाणीव हा पुरस्कार आम्हाला कायम करून देत राहील.

बॉम्बे मॅनेजमेंट असोसिएशन ही उद्योग व व्यवसाय व्यवस्थापनातील मापदंड, मानके सुधारण्यासाठी कटिबद्ध असलेली एक अग्रेसर संस्था असून त्यांचे या क्षेत्रातील योगदान उल्लेखनीय आहे. डॉ. व्ही. एन. ब्रीम्सला यापूर्वीही अशा अनेक पुरस्कारांनी सन्मानित केले गेले आहे. मध्यवर्ती उपनगरांमधील आणि खास करून ठाण्यातील व्यवस्थापन शिक्षणाचा संपूर्ण कायापालट या संस्थेने केलेला आहे.